**प्रेस नोट** **दि ३१/०७/२०१९**

## दामिनी मार्शल भरोसा सेल,गुन्हे शाखा पुणे शहर

## अल्पवयीन मुलीला तीच्या आत्याच्या सुखरुप ताब्यात दिले बाबत

दामिनी मार्शल स्वारगेट / लष्कर म पो ना भालेराव ,म पो शि रणसींग असे मिळुन दि २७/०७/२०१९ रोजीच्या सुमारास हद्दीमध्ये पेट्रोलींग करत असताना पी एम टी स्वारगेट बस स्टॉप येथे १९/३० वा चे दरम्यान महिला नामे मधु राजु ठाकुर वय ४० वर्षे रा लक्ष्मीनगर लक्ष्मीनारायण थेटरच्या मागे दत्तवाडी शिवदर्शन पुणे यांनी आम्हाला सांगीतले की माझी भाची दु.१३/०० वा राहते घरातुन सांगुन निघाली की,मी आपल्या निराच्या दुकानातुन जावुन येते असे सांगुन गेली. ती अद्याप पर्यत घरी न आल्याने आम्ही तीचा सर्व ठिकाणी शोध घेतला परंतु ती मिळुन येत नाही. सदर मुलीला मराठी , हिंदी भाषा बोलता येत नसुन फक्त तेलगु भाषा बोलता येते. तरी तुम्ही मला मदत करा असे म्हणाल्या व त्यांनी आम्हाला त्यांचा मोबाईल नंबर वरुन आमचे व्हॉटअप मोबाईल नंबर वर फोटो पाठविला. व महिला या तिथुन निघुन गेल्या. आम्ही सदर मुलाचा शोध घेण्यासाठी १९/४५ वा स्वारगेट रिक्षा स्टँड येथे गेलो असता सदर मुलगी हि एका रिक्षा चालका बरोबर बोलताना आढळुन आली. आम्ही तीची विचारपुस केली असता आम्हाला असे जाणवले कि ती मुलगी तीच आहे. सदर मुलीची मोबाईल मध्ये फोटो पाहुन खात्री केली.सदर मुलीला ताब्यात घेवुन स्वारगेट पोलीस स्टेशन येथे घेवुन गेलो.व नंतर तीच्या आत्यास फोन केला. व त्यांना स्वारगेट पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेतले. याबाबत तिच्या आत्याचा सविस्तर जबाब घेवुन मुलीस वय १७ वर्षे हिस व तीची आत्या यांना व पो नि श्री कदम सो यांच्या समोर हजर करुन महिला नामे मधु राजु ठाकुर यांच्या सुखरुप ताब्यात दिले.त्याबाबत स्टेशन डायरी नोंद केली.आहे. सदर मुलीच्या नातेवाईकानी दामिनी मार्शलचे आभार व्यक्त केले.